स्थापना : ०७/१०/१९२७ रजि नं.६००१

# अहमदनगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., अहमदनगर

प्लॉट नं १७३,क १, केतकर हॉस्पिटल शेजारी,टिळक रोड,अहमदनगर

फोन नं २४७०११०

**संस्थेच्या दिनांक ०५/०६/२०२२ रोजीची वार्षिक सर्वसाधारण सभा व दिनांक ०९/०८/२०२२ रोजीची विशेष सर्वसाधारण सभेत सभासदांकडून सभेत मंजूर झालेले पोटनियम व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहमदनगर यांनी मंजूर केलेले पोटनियम.**

•••••••

## * सभासद कुटूंब आधार विमा योजना *

| | |
|---|---|
| ३७ फ फ<br>१.९<br>(अ.नं.३७ इ) | • सभासद कुटूंब आधार विमा योजना •<br>१) संस्था सभासदाच्या कायम निधी मधून रु. ७५०००/- रक्कम सभासद कुटूंब आधार विमा योजना नावाने सुरु केलेल्या योजनेत वर्ग केली जाईल. सदरील रक्कम ही कायम निधीतून समान ५ हप्त्यात ५ वर्षात प्रती वर्ष रक्कम रु.१५०००/- हजार प्रमाणे वर्ग केली जाईल.<br>२) संस्था सभासदाच्या कायम निधी मधून सभासद कुटूंब आधार विमा योजना फंडात वर्ग केलेल्या रक्कमेवर सभासदांना कुठल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.<br>३) नवीन सभासद झाल्यानंतर त्यांचे लगतच्या महिन्यातील वेतनातून रक्कम रु.१५०००/- एक रक्कमी कपात करील किंवा एक रकमी भरणा न केल्यास कर्ज स्वरुपात देऊन कुटूंब आधार विमा योजनेत वर्ग केली जाईल. त्यानंतर दुस-या वर्षापासून उर्वरित हप्ते कायमनिधीतून वर्ग केले जातील.<br>• वरील रक्कमेतून पुढील लाभ दिले जातील. •<br>१) सभासद सेवेत असतांना मयत झाल्यास आणि त्याने संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास त्यास देण्यात येणा-या १५ लाख विम्याच्या रकमेतून शिल्लक कर्ज रक्कम वसूल करून त्यांच्या कुटूंबाला कुटूंब आधार विमा योजनेचा लाभ दिला जाईल.<br>२) सभासद सेवेत असतांना मयत झाल्यास आणि त्याने संस्थेकडून कुठल्याही प्रकारचे कर्ज शिल्लक नसल्यास त्यांचे शेअर्स कायम निधी खाती जमा असलेली सर्व रक्कम अधिक कुटूंब आधार योजने अंतर्गत रक्कम रु.१५ लक्ष त्यांच्या कुटूंबाला दिले जातील.<br>३) मयत सभासदास कुटूंब आधार योजनेतून १५ लाख विमा रकमेचा लाभ देत असल्याने कुटूंब आधार योजनेचे ५ ही हप्ते वसूल करून उर्वरित विम्याची रक्कम त्याचे वारसांना दिली जाईल.<br>• सभासद कुटूंब आधार विमा योजने साठी खालील अटीशर्ती लागू राहतील •<br>१) सेवानिवृत्त अथवा राजीनामा दिलेल्या सभासदांचे सभासदत्व रद्द करतांना कुटूंब आधार विमा योजनेत गुंतविलेली सर्व रक्कम परत केली जाईल. मात्र या रक्कमेवर व्याज अनुज्ञेय असणार नाही.<br>२) सभासद कुटूंब आधार विमा योजना ही माजी सभासद अथवा सेवानिवृत्त सभासदांना लागू राहणार नाही सभासद कुटूंब आधार विमा योजना नावाने सुरु केलेल्या फंडातून सभासद कुटूंब आधार विमा योजना आणि सभासदांचा ग्रुप जनता अपघात विमा उतरविणे या व्यतिरिक्त इतर कुठल्याही योजना राबविल्या जाणार नाही. |



Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| | ३) कुटूंब आधार विमा योजनेमध्ये जमा होणारी रक्कम ही संस्थेत ठेव स्वरूपात ठेवण्यात येईल.त्यावर प्रचलित मुदत ठेवीच्या व्याजदराने व्याज दिले जाईल. सदर व्याजाची रक्कम कुटूंब आधार विमा योजनेत जमा केली जाईल.<br>४) वारसाने मदत मिळणेसाठी सभासदांचा मृत्यूचा दाखला व सक्षम अधिका-याने दिलेले वारस दाखला जोडून संस्थेकडे लेखी अर्ज केला पाहिजे.<br>५) गरज वाटल्यास संस्था सक्सेशन सर्टीफिकेट मागू शकते ते देणे वारसास बंधनकारक असेल.<br>६) वारस एकापेक्षा जास्त असतील व एकाच वारसाने रक्कम मिळण्याची मागणी केली असेल तर तसे सर्व वारसांनी सक्षम प्राधिका-या समोरील प्रतिज्ञापत्र संस्थेस देणे बंधनकारक असेल.<br>७) वारस एकापेक्षा जास्त असतील व त्यांनी सर्वांनी मदत मिळणेसाठी मागणी केल्यास मदत विभागून देण्यात येईल. अशा वेळी वारसामध्ये काही वाद असतील आणि सभासदांचे पती अथवा पत्नी जिवंत असतील तर आशा वेळी कुटूंब आधार विमा योजनेची संपुर्ण रक्कम ही सभासदाचे पती अथवा पत्नी यांना देण्यात येईल.<br>८) वारस अज्ञान असल्यास त्या वारसाचे पालकत्व घेतलेली व्यक्ती कुटूंब आधार विमा योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज करू शकते<br>९) वारस अज्ञान असल्यास त्यांचे संगोपनासाठी कुटूंब आधार विमा योजनेच्या रकमेचा विनियोग केला जाईल. असे सक्षम अधिका-यासमोर प्रतिज्ञापत्र संबधित मागणी करणा-या वारसाचे पालकत्व घेतलेल्या व्यक्तीने करून देणे बंधनकारक राहील.<br>१०) सदर विमा योजनेत भाग घेणे साठी सभासदाने ना हरकत दाखला देणे बंधनकारक राहील<br>११) कुटूंब आधार विमा योजनेचा लाभ जेष्ठतेनुसार दिला जाईल.आणि या योजनेत दुरुस्ती अथवा सुधारणा करण्याचे अधिकार सर्व साधारण सभेला राहतील. यास मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अ.नगर यांची मंजुरी घ्यावी लागेल.<br>१२) सभासद कुटूंब आधार विमा योजना कपातीबाबत ज्या सभासदांची काही हरकत असल्यास या योजनेतून वगळण्याबाबत त्या सभासदांचे लेखी संमती पत्र संस्थेत सादर करणे बंधनकारक राहील. |

**सभासदांना द्यावयाच्या कर्जासंबंधी सहकार आयुक्त निबंधक व सहकारी संस्था**